परिवहन समितीच्या सभा, बुधवार दि. ०६/०३/२०१९ रोजी दुपारी ०३:०० वाजता सिव्हील कार्यालयातील डॉ. पंजाबराव देशमुख स्मृति, स्थायी समिती सभागृहात भरलेल्या सभेचा अहवाल.

**उपस्थित सदस्य**

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| 1 | मा. श्री. जितेंद्र धनराज कुकडे | **सभापती** |
| 2 | मा. सौ. विद्या योगेश मडावी | **सदस्या** |
| 3 | मा. सौ. मनिषा आशिष धावडे | **सदस्या** |
| 4 | मा. सौ. अर्चना विवेक पाठक | **सदस्या** |
| 5 | मा. सौ. उज्वला प्रकाश शर्मा | **सदस्या** |
| 6 | मा. सौ. वैशाली देवचंद रोहणकर | **सदस्या** |
| 7 | मा. सौ. अभिरूची अनिल राजगिरे | **सदस्या** |
| 8 | मा. सौ. कल्पना राम कुंभलकर | **सदस्या** |
| 9 | मा. श्री. प्रवीण विलासराव भिसीकर | **सदस्य** |
| 10 | मा. श्री. नितीन रामभाऊ साठवणे | **सदस्य** |
| 12 | **मा. श्री. प्रदिप वसंतराव पोहाणे**<br>**सभापती स्थायी समिती – पदेन सदस्य** | **सदस्य** |

**अनुपस्थित सदस्य**

| | | |
|---|---|---|
| 1 | मा. श्री. नितीश गंगाप्रसाद ग्वालबंशी | **सदस्य** |
| 2 | मा. श्री. नरेंद्र नत्थुजी वालदे | **सदस्य** |

**उपस्थित अधिकारी**

| अ. क्र | नावे | पद |
|---|---|---|
| 1 | **श्री. शिवाजी जगताप** | **परिवहन व्यवस्थापक** |
| 2 | **श्री. हरिश दुबे** | **निगम सचिव** |

मा.सभापती, परिवहन समितीच्या सभेच्या कार्यवाही ला सुरुवात केली.

**ठराव क्रमांक ४४** :– परिवहन विभाग, मनपा चे आर्थिक वर्ष २०१८–१९ मध्ये मनपा निधीतून रु. १०८ कोटी निधी मंजूर करण्यात आला असून NMC The City of Nagpur Transport Fund, या बॅंक ऑफ महाराष्ट्र, सिव्हिल लाईन्स नागपूरच्या Current Account मध्ये सुरूवाती ची शिल्ल्कसह माहे जानेवारी २०१९ रू. **५,५०,३९,९२८**/–तिकीट विक्री चा महसुल जमा झाला आहे. त्या पैकी जानेवारी २०१९ एकूण रु. **११,६८,६१,२३१**/–हा विविध लेखा शिर्षाअंतर्गत खर्च झाला आहे.

या खर्चाचा लेखा जोखा परिवहन समीती समक्ष सादर करून व मान्यता प्राप्त करून कार्योत्तर वित्तीय मान्यता घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून त्यास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक ४५</u>** :— ''आपली बस'' या प्रकल्प अंतर्गत नागपूर महानगरपालिका मार्फत जी.सी.सी. / पी.पी.पी. तत्वान्वये ०३ रेड बस ऑपरेटरची नियुक्ती केलेली आहे. (मे. आर.के. सिटी बस सर्व्हीसेस, मे. ट्रॅव्हल टाईम सिटी बस सर्व्हीसेस व मे. हंसा सिटी बस सर्व्हीसेस) व ०२ वाहक पुरवठा करणारी एजेन्सी मे. युनिटी सेक्युरेटी सर्व्हीसेस, नागपूर व मे. एस.आय.एस. सेक्युरेटी सर्व्हीसेस, नागपूर तसेच या ०५ ऑपरेटर ०२ नियंत्रण ठेवण्याकरीता आय.बी.टी.एम. (मे. डिम्टस्) ऑपरेटरची नियुक्ती करण्यात आलेली आहे. हया ०६ ऑपरेटरसोबत करारनामा सुध्दा करण्यात आलेला आहे. बस ऑपरेटर सोबत झालेला करारनामा मध्ये डेपो करीता जागा, सदर डेपोकरीता सुरक्षा भिंत व सदर जागेचे बळकटीकरण तसेच इस्क्रो खाते उघडणे अशी जबाबदारी महानगरपालिकेची आहे. हया ०६ ऑपरेटर सोबत करारनामा करतेवेळी शहर बस संचालनाची सुरवातीची स्थिती तसेच मनपाची आर्थिक परिस्थिती ची संपुर्ण माहितीच्या अनुषंगाने त्यांनी करारनामावर स्वाक्षरी केलेल्या आहे.

वाहक पुरवठा करणारी ०२ एजेन्सी द्वारे दैनंदिन वाहकांचा पुरवठा आवश्यकता नुसार होत नाही. बस ऑपरेटर द्वारे दैनंदिन बसेस स्वच्छ करीत नसुन, नादुरूस्त बसेसचे प्रमाण सुध्दा जास्त आहे. मे. डिम्टस् ऑपरेटरद्वारे ठरलेल्या मानकाप्रमाणे दैनंदिन निश्चित प्रवासी उपलब्ध होणे करीता प्रयत्न होत नसल्याने करारनामा नुसार मनपाद्वारे ''पेनाल्टी'' आकारण्यात आलेली आहे.

मनपाद्वारे करारनामानुसार कंडीशन प्रिसीडेंट ची अट पुर्ण न केल्याने ऑपरेटरवर ''पेनाल्टी'' आकारण्यात येवू नये म्हणून मा. आयुक्त, मनपा यांना लेखी निवेदन सादर केलेले आहे. करारनामा मध्ये नमुद स्टेयरिंग कमेटी च्या दि. ०५/११/२०१८ रोजी मा. आयुक्त, मनपा यांना सदर ''पेनाल्टी'' चा विषय परिवहन समिती, मनपा समक्ष ठेवण्याबाबत निर्देश दिले. म्हणून ०३ बस ऑपरेटर, ०२ वाहक पुरवठा करणारी एजेन्सी व मे. डिम्टस् या ऑपरेटरवर लावण्यात आलेली ''पेनाल्टी'' वर निर्णय घेण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून दररोज १.५० लाख प्रवाशांनी बसेसमध्ये प्रवेश करणे अपेक्षित असतांना प्रवाशांची संख्या कमी आहे. ३२७ बसमधून अपेक्षित प्रवासी प्रवास करीत नसल्याने डिम्टस्‌ला दंड आकारण्याची जबाबदारी निश्चित करण्यासाठी चे मा. सभापती यांना अधिकार आहेत. डेपोसाठी महानगरपालिकेने जागा उपलब्ध केली तथापी मुलभुत सुविधा न केल्यामुळे तसेच इस्क्रो खाते न उघडल्यामुळे या बाबींचा दंड आकारतांना विचार करण्यात यावा. परिवहन सेवेतील बसेस स्वच्छ ठेवण्याची जबाबदारी डिम्टस् कंपनीवर आहे परंतु डेपोच्या ठिकाणी डांबरीकरण नसल्याने पावसाळयाच्या दिवसात बसेस चिखलामुळे अस्वच्छ होतात. त्याकरिता डेपोच्या जागेचे बळकटीकरण नसल्याने तसेच प्रखर उन्हाळयाच्या सत्रात विविध पातळीवर बस ऑपरेटर यांना गैरसोयीचे होत असल्याच्या बाबी लक्षात घेऊन सर्व सहाही कंत्राटदारांना केवळ माहे नोव्हेंबर, डिसेंबर या दोन महिन्यांची पेनॉल्टी लावण्यात यावी आणि उर्वरित पेनॉल्टी माफ करण्यात यावी, तसेच संबंधीत डेपो निहाय जागेकरीता सुरक्षा भिंत व सदर जागेचे बळकटीकरणाकरिता लागणारा खर्च परिवहन विभागाने सुचित केलेल्या योग्य निकषाद्वारे प्रथम बस ऑपरेटर यांनी प्रमाणित करून लावावा आणि यासर्व बाबींकरिता ऑपरेटरांकडुन लावण्यात आलेला खर्च हा म.न.पा.मार्फत त्यांच्या मासिक देयकांमध्ये प्रस्तावित करण्यात यावा या सुचनेसह या विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**<u>ठराव क्रमांक ४६</u>** :— नागपूर शहर बस वाहतुकीच्या दैनंदिन १०११ फेऱ्या या महाराजबाग रोड, आकाशवाणी चौक, विधानभवन व रिजर्व बॅंक चौक या मार्गाने प्रवासी वाहतुक करतात. कारण हया मार्गावर नागपूर शहरातील प्रमुख शासकीय/निमशासकीय

कार्यालय, न्यायालय व शैक्षणिक संस्था असल्याने प्रवाश्यांची संख्या देखील जास्त आहे. तसेच हया मार्गावर कार, जीप व दुचाकी वाहनांची सुध्दा वर्दळ जास्त असते.

त्यामुळे आकाशवाणी चौक ते रिजर्व बॅक चौक हया पॉम रोडवर नेहमी वाहतुकीची कोंडी होते.

शहर बस वाहतुक मध्ये प्रवासी चढ/उतार करीता पुर्वा आकाशवाणी चौक व विधान भवन येथे फक्त ०२ बस शेल्टरची निर्मिती मनपाद्वारे करण्यात आलेली होती. त्यामुळे हया मार्गावर ०८ मुख्य व अतंर्गत ४४ मार्गाने फेऱ्या सतत येत असल्याने प्रवासांची सुध्दा ताराबंळ होत होती. म्हणुन मनपा द्वारे आकाशवाणी चौक व विधान भवन येथे असलेले ०२ बस शेल्टर नंतर डी.ए.जी.पी.टी./आय.सी.आय.सी.आय. बॅक समोर/नारंग टावर/इलाहाबाद बॅक जवळ असे एकूण ०४ बस शेल्टरची निर्मिती केलेली आहे. म्हणजे सध्या ०६ बस शेल्टर असल्याने, हया बस शेल्टर निहाय शहर बस मार्गाचे वर्गीकरण करण्यात आलेले आहे. हया शहर बस शेल्टर निहाय निश्चित मार्गाचे बसेस प्रवासी चढ/उतार करतील. त्यामुळे आकाशवाणी चौकात शहर बस मुळे वाहतुकीची कोंडी होणार नाही.

सदर बदल करण्यापुर्वी प्रवाश्याना माहिती होणे आवश्यक असल्याने ०८ बॅनर (०६ बस शेल्टर / महाराजबाग बस टर्मिनल / मोरभवन बस टर्मिनल) व अदांजे १०,००० पॉमपेल्ट ची छपाई करून प्रवासामध्ये वाटणे आवश्यक आहे. हया नंतर तारीख निश्चित करून सदर प्रस्तावाची अंमलबजावणी करणे योग्य होईल. सदर ०८ बॅनर व १०,००० पॉमपेल्ट करीता अंदाजे रू. २५,०००/— खर्च होणार असल्याने, हया बाबतचे प्रस्तावास मान्यता प्रदान करण्याचा प्रश्न समितीने विचारात घेवून शहर बस शेल्टर निहाय निश्चित मार्गावरील बदलासंबंधाने प्रवाश्यांमध्ये वाटप करण्यात येणारे बॅनर आणि पॉमपेल्टच्या छपाईच्या खर्चाचा विषय डिम्स्च्या अखत्यारितील विषय असल्याने महापालिकेकडून खर्च करणे अपेक्षित नाही. हा खर्च डिम्स्ने करावा व बॅनर, पॉमपेल्टचे प्रवाश्यामध्ये वाटप तसेच नागपूर शहर बसमध्ये वाहतुक करण्यासाठी प्रवाश्यांना सहमत करण्याचे काम डिम्स्च्या चेकरमार्फत करण्यात यावे. तसेच प्रत्येक बसथांब्यावर बसचे वेळापत्रक लावण्यात यावे या सुचनेसह या विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक ४७** :— नागपूर महानगरपालिका परिवहन विभागातर्फे महानगरपालिका अधिनियमार्तगत कलम ९७ व ९८ अन्वये परिवहन विभागाचे स्वतंत्र अर्थसंकल्प 'ब' तयार करण्याबाबतचे तरतुदीनुसार सन २०१८—१९ चे सुधारित अंदाजपत्रक व सन २०१९—२० चे प्रस्तावित अंदाजपत्रक तयार करण्यात आले आहे. त्या अनुषंगाने सन २०१९—२० चे प्रस्तावित अर्थसंकल्प 'ब' ''सादर करतांना परिवहन व्यवस्थापक यांनी खलील प्रमाणे वाचन करून सादर करण्यात आला सन्माननिय सभापती, परिवहन समिती, मनपा, नागपूर तसेच मा. सदस्य, परिवहन समिती व माझे सर्व अधिकारी व कर्मचारी बंधु आणि भगिनिंनो.

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम ९७ व ९८ नुसार नागपूर महानगरपालिकेच्या सन २०१८—१९ चा सुधारीत व २०१९—२० चा **प्रस्तावित** अर्थसंकल्प 'ब' मी आपल्यापुढे सादर करीत आहेत.

सन २०१९—२० या आर्थिक वर्षाचे अर्थसंकल्प ‘ब’ चे उत्पन्न रू. २८,१८,४.२० लक्ष अपेक्षित आहे. सुरूवातीची शिल्लक रू.१४.८६ लक्ष अपेक्षित शिल्लक धरून एकूण उत्पन्न रू. २८१९९.०६ लक्ष हे अपेक्षित उत्पन्न गृहीत धरून या आर्थिक वर्षात (सन २०१९—२०) रु.२८१८६.०३ लक्ष खर्च होईल. त्यामुळे मार्च २०२० अखेरची अपेक्षित शिल्लक रू. १३.०३ लक्ष इतकी राहील.

परिवहन उपक्रमासाठी महाराष्ट्र महानगरपालिका कायद्या अंतर्गत जे स्वतंत्र शिर्ष अर्थसंकल्पामध्ये नियोजित करावयाचे होते, त्या सगळया बाबींचा हया अर्थसंकल्पात समावेश करण्यात आला असून त्यामध्ये परिवहन उपक्रमाच्या परिचालना करीता ‘शहर परिवहन निधी’ हा उघडण्यात आलेला आहे. तसेच महसुलाच्या जादा शिल्लकीचा विनियोग करण्याकरीता ‘महसुल राखिव निधी’ या नावाचा स्वतंत्र शिर्ष उघडण्यात आलेला आहे. त्याप्रमाणे ‘परिवहन सुधारणा निधी’ सुध्दा स्थापन करण्यात आलेला आहे.

नागपूर रहिवाशांना कार्यश्रम व नियोजित अशी शहर बस सेवा देण्याच्या अनुषंगाने शहर बस वाहतूकीचे पुर्ननियोजन करण्यात आलेले आहे.

सन २०१८—१९ या आर्थिक वर्षात डिझेल बस १८०, मिडी बस १५० अशा अशा ३३० बसेस नागरिकांच्या सेवेत सध्या शहर बस मार्गावर संचलित आहेत. सन २०१९—२० या वर्षात महाराष्ट्र शासनाच्या धोरणानुसार ०६ इलेक्ट्रीकवर चालणाऱ्या मिडी तेजस्विनी बसेस या फक्त महिलांसाठी संचालित होणार आहेत. त्याचप्रमाणे पर्यावरणास पुरक धोरण राबविण्याच्या अनुषंगाने बस ऑपरेटरकडे मनपाच्या ५० स्टॅन्डर्ड बसेसचे परिवर्तन बॉयो सी.एन.जी. या तत्वावर परिवर्तीत करून नागपूर शहरबस सेवेत दाखल होणार आहेत. त्याप्रमाणे प्रतिबस ऑपरेटर १५ मिनी बसेस प्रमाणे एकूण तीन डिझेल बस ऑपरेटर कडून एकूण ४५ मिनी बस शहर बस सेवेत जादाच्या दाखल होणार आहे. या मिनी बसेसचा वापर शहरातील लहान मार्गावर संचालित करून शहरवासियांना लगतच्या मेट्रो स्टेशन पर्यंत सेवा देण्याकरीता प्रामुख्याने याचा वापर होवू शकतो. तसेच शहरातील इतर प्रमुख बस स्थानकापर्यंत या मिनी बसेसची सेवा देखील देता येईल.

सध्या स्थितीत शहर बस सेवेचा लाभ घेणाऱ्या दैनिक सरासरी प्रवाश्यांची संख्या ही १ लक्ष ५७ हजार (पास धारकासह) ही असून चालविण्यात येणाऱ्या दैनिक बसेसच्या एकूण ४६१७ फेऱ्या आहेत. इलेक्ट्रीक बस तथा मिनी बस शहर बस सेवेत दाखल झाल्यावर निश्चितच प्रवासी संख्या व बसेसच्या फेऱ्यात वाढ होईल. पर्यायाने या उत्पन्न वाढीस त्यामुळे मदत होईल.

माहे. जानेवारी २०१९ पासुन डिझेल दरात होणारी वाढ यामुळे तिकीट दरात २४ टक्के सरासरी वाढ शासनाचे मंजुरी नुसार करण्यात आली असून त्यामुळे याचा फायदा काहीप्रमाणात उत्पन्न वाढीसाठी होत आहे.

दि. ०२/०३/२०१९ पासुन दिव्यांगांना व त्यांच्या सोबतच्या साथीदारास निशुल्क प्रवासाची सुविधा उपलब्ध करून देण्यात आली आहे तसेच लष्कर आणि निम लष्कर दल तथा पोलिस दलातील शहीद जवानांच्या विरमाता, विरपत्नी तथा मुलांना शहर बस सेवेत मोफत प्रवासाची सुविधा यापुर्वीच उपलब्ध करून देण्यात आलेली आहे.

आगामी वर्षात नागपुर शहरात मेट्रो सेवेचे संचालन सुरू होणार त्यावेळी शहर बसेस व मेट्रो रेल्वेचे माध्यमातुन प्रवास करणारे प्रवासी यांना कॉमन मोबिलीटी कार्ड या योजनेची अंमलबजावणी करण्यात येणार असून शहर बस व मेट्रो रेल्वेचा सलग वापर प्रवाश्यांना करता येईल.

त्याचप्रमाणे या आगामी वर्षात प्रवासी उपलब्धता तथा आवश्यकतेप्रमाणे शहराच्या जास्तीत जास्त मार्गावर बसेसची सेवा देणे हे परिवहन विभागाचे प्रमुख धोरण राहील. नव्याने कोराडी मंदिर जवळ २०,००० स्क्वे. मि. ०१ बस डेपो एन.आय.टी. / एन.एम.आर.डी.ए. तर्फे विकसीत करण्यात येत असून हा एक जादाचा डेपो शहर बस सेवेत लवकरच दाखल होणार आहे.

अर्थसंकल्पीय वर्षात परिवहन विभागामार्फत कार्यक्षम व सुलभ परिवहन सेवा देतांना प्रारंभीचे कालावधीत मनपाला जरी आर्थिक तुट देणारी असली तरी जनहीताच्या दृष्टीने नागपूर शहराकरीता किफायतशिर व कार्यक्षम बस सेवा देणे हे नागपूर महानगरपालिकेचे मुख्य धोरण आहे. नागपूर महानगरपालिकेने जे परिवहन विभागाचे प्रगती करीता वेळोवेळी केलेले आर्थिक सहकार्य यामुळेच परिवहन विभागाची सेवा प्रगती पथावर आहे. परिवहनाच्या वाटचालित मा. अध्यक्ष, स्थायी समिती, मा. अध्यक्ष परिवहन समिती, मा. सदस्य, परिवहन समिती यांचे मोलाचे सहाकार्य मिळाले असून यापुढेही ते मिळत रहावे, अशी मी अपेक्षा करतो.'' यांस मान्यता देण्याबाबतचा प्रश्न समितीने विचारात घेवून अर्थसंकल्पात दुरूस्ती आणि फेरबदल करण्याचे अधिकार मा.सभापती, परिवहन समिती यांना देण्यात येते या सुचनेसह विषयास समितीने एकमताने मंजूरी प्रदान केली.

**ठराव क्रमांक ४८** :— आजच्या सभेची कार्यवाही कायम करून ही सभा अनिश्चित काळाकरिता स्थगित केली.

**निगम सचिव**
**महानगरपालिका,नागपूर**

**सभापती**
**परिवहन समिती**
**महानगरपालिका,नागपूर**